रोटरी क्लब व श्री व्यंकटेश महाविद्यालय यांच्यामध्ये सामंजस्य करार

समाजसेवी संस्था रोटरी क्लब ऑफ अतिग्रे व इचलकरंजी शहरातील शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित श्री व्यंकटेश महाविद्यालय यांच्यामध्ये विविध बाबीवर सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामध्ये श्री व्यंकटेश महाविद्यालयाकडून प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने व रोटरी क्लब ऑफ अतिग्रे यांच्याकडून प्रेसिडेंट यास्मिन बसरुद्दीन मनेर यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी भौतिक सोयी-सुविधा कायम पुरविणे, व्यावसायिक अभ्यासक्रम पुरविणे, शास्त्रीय, सामाजिक आणि पर्यावरणीय जागरूकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे, आरोग्य सेवा पुरविणे, बौद्धिक आणि कलात्मक कौशल्य पुरविणे, करिअर जागरूकता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे असे अनेक उद्देश समोर ठेवून हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

रोटरी क्लब आजपर्यंत अनेक समाज उपयोगी कामे करणारी जागतिक नेटवर्क संघटना असून आज पर्यंत रोटरी क्लब ने आपली संपत्ती, ऊर्जा, साधने व श्रम समाजाच्या सुधारण्यासाठी व समाज उन्नतीसाठी सदैव वापरत आले आहे. समाज विकासासाठी व उन्नतीसाठी काम करणारी व समाज सुधारणा मध्ये मोलाचे योगदान रोटरी क्लब कडून देण्यात येते. पाच वर्षांच्या कालावधीसाठी हा करार करण्यात आला असून 'विद्यार्थी व समाज विकास' हे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून दोन्ही संस्थांमधील मान्यवरांच्या उपस्थितीत स्वाक्षरी होऊन करारास मान्यता देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी हा सामंजस्य करार विद्यार्थ्यांच्या व महाविद्यालयाच्या परिसरातील सर्वांसाठी सर्वांगीण विकास साधण्यासाठी खूप उपयुक्त ठरेल असा विश्वास त्यांनी आपल्या मनोगतामध्ये व्यक्त केला.



सामंजस्य कराराच्या देवाण-घेवाण प्रसंगी रोटरी क्लब ऑफ अतिग्रे च्या प्रेसिडेंट यास्मिन बसरुद्दीन मनेर व व्यंकटेश महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व प्राध्यापक श्री. ए. बी. विभूते